**दिनांक ०१/१०/२०२०**

## प्रसिध्दी पत्रक

**१)आरोपी लोकसेवक हर्षल निवृत्ती येवले, कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, ता.फुलंब्री, औरंगाबाद**
**२) आरोपी -खाजगी इसम पंडीत कडुबा जेठे, व्यवसाय मजुरी रा. शेरुडी, ता. फुलंब्री, जि.औरंगाबाद यांनी २८,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे व आरोपीचे नांव व पत्ता | :- | १) आलोसे हर्षल निवृत्ती येवले, वय २३ वर्ष, कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, ता. फुलंब्री, जि.औरंगाबाद (वर्ग-३)<br>२) आरोपी खाजगी इसम पंडीत कडुबा जेठे, वय ३४ वर्ष, व्यवसाय मजुरी रा.शेरुडी, ता.फुलंब्री जि.औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे फुलंब्री, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. |
| घटनेचे ठिकाण | :- | पाल फाटा येथे, ता. फुलंब्री, जि.औरंगाबाद |
| लाच स्विकारली रक्कम | :- | २८,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या भावाच्या नावावर नानाजी देशमुख कृषी संजीवनी (POCRA) योजने अंतर्गत मंजुर शेत तळयाच्या अनुदानाची रक्कम रु १,६७,९५०/- बॅकेत जमा केल्याचा मोबदला/ बक्षीस म्हणुन |
| तपासी अधिकारी | | श्री. महादेव ढाकणे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांच्या भावाच्या नावावर नानाजी देशमुख कृषी संजीवनी (POCRA) योजने अंतर्गत मंजुर शेत तळयाच्या अनुदानाची रक्कम रु १,६७,९५०/- बॅकेत जमा केल्याचा मोबदला/ बक्षीस म्हणुन हर्षल येवले, कृषी सहायक हे तक्रारदार यांच्याकडे ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करत असल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद कडे दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, हर्षल येवले, कृषी सहायक यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडी अंती २८,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच पंडीत जेठे यांच्याकडे देण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक ०१/१०/२०२० रोजी वर नमुद ठिकाणी सापळा लावण्यात आला असता, खाजगी इसम पंडीत कडुबा जेठे, वय ३४ वर्ष व्यवसाय मजुरी रा.शेरुडी, ता.फुलंब्री जि.औरंगाबाद यांनी आलोसे हर्षल निवृत्ती येवले, कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद यांनी मागणी केल्याप्रमाणे २८,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद दोन्ही आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे फुलंब्री, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**
**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.